जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७९ दिनांक - १५/११/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर

## देशी हातबनावटीचे पिस्टल बाळगणा-या सराईतास केले जेरबंद

मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे,पुणे शहर यांचे आदेशाने परिमंडळ १,२ व ३ पोलीस स्टेशनचे हद्दीत कोंबिंग ऑपरेशन करीत असताना **पोलीस अंमलदार श्रीकांत दगडे व दत्तात्रय पवार** यांना भुमकर चौकाकडुन स्वामीनारायण मंदीराकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडलगत साई पॅलेस लॉजच्या पुढे काही अंतरावर एक इसम उभा असुन त्याचेजवळ एक पिस्टल आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाली.

सदर बातमीप्रमाणे खात्री झाल्याने स्टाफचे मदतीने त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी करुन सदर इसमास त्याचे नाव, पत्ता विचारता त्याने आपले नाव व पत्ता **केशव अशोक राठोड, वय- २५ वर्षे, रा. चरवड वस्ती, वडगाव बुद्रुक, पुणे** असे सांगितले. त्याची अंगझडती घेता त्याचेजवळ **एक देशी हातबनावटीचे पिस्टल व १ जिवंत राऊंड असा एकुण किं रु ४०,२००/-** चा अग्निशस्त्र असलेला माल विना लायसन्स व बेकायदेशीररित्या जवळ बाळगताना मिळुन आला. म्हणुन त्याचेविरुध्द आंबेगाव पोलीस स्टेशन येथे **आर्म ॲक्ट कलम ३ सह २५ व महा पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीचा गुन्हे अभिलेख पाहता त्याचेवर सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे दोन गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. रंजनकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,श्री. शैलेश बलकवडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),श्री निखिल पिंगळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.गणेश इंगळे, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे १,दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार बिडवई, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे, पोलीस उप निरीक्षक, शाहीद शेख, पोलीस अंमलदार दत्तात्रय पवार, गणेश ढगे, बाळु गायकवाड, प्रदीप राठोड, धनंजय ताजणे, अजित शिंदे, इरफान पठाण, मनिषा पुकाळे, पोलीस नाईक रविंद्र लोखंडे, श्रीकांत दगडे,महेश पाटील,साईकुमार कारके, शिवाजी सातपुते, अमित गद्रे, अक्षय गायकवाड यांनी केली आहे.


दरोडा व वाहनचोरी
विरोधी पथक १,
गुन्हे शाखा,
पुणे शहर
AI-generated content